| | **प्रसिद्धिपत्रक** | |
|---|---|---|
| | **पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस जवळ,<br>पुणे-४११००६** | |

**जा.क्र./पोउआ/वाह/३९१६/२०२४** **पुणे दिनांक - ०३/०६/२०२४**

पुणे शहरातील लोणीकंद वाहतूक विभागा अंतर्गत केसनंद फाट्यासमोर नगर बाजुकडे जाणारा रस्ता हा अरुंद आहे. केसनंद फाट्यासमोर नगररोडकडे जाणा-या बाजुस भारत पेट्रोलपंपासमोर पुण्यातुन नगर, मराठवाडा, विदर्भ, खांदेश येथे जाणा-या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने वरील सर्व मार्गावरुन जाणारे प्रवासी ट्रॅव्हल्सने प्रवास करीत असतात. सदर ट्रॅव्हल्स या केसनंद फाट्याजवळील पेट्रोल पंपासमोर पिक-अप – ड्रॉप करीत असल्याने दररोज रात्रीचे वेळी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होऊन त्याचा सामान्य नागरीकांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे.सदर ठिकाणची वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी रोहिदास पवार, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर, लोणीकंद वाहतुक विभागातील खालील नमुद रस्त्यावर तात्पुरत्या स्वरुपात दि.०४/०६/२०२४ पासुन खालील प्रमाणे आदेश निर्गमित करीत आहे.

**लोणीकंद वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

- **वाघेश्वर चौक, केसनंद फाटा ते बकोरी फाटापर्यंत ट्रॅव्हल्स बसेस करीता नो हॉल्टींग, नो पार्किंग करण्यात येत आहे.**
- **सदर ट्रॅव्हल्स बसेस यांना बकोरी फाट्याचे पुढे थांबा देण्यात येत आहे.**

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, येरवडा पोस्ट ऑफीस, बंगला नं-६ जेल रोड पुणे-४११००६ यांचे कार्यालयात दिनांक – ०४/०६/२०२४ ते दिनांक – १८/०५/२०२४ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यांवश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**(रोहिदास पवार)**
पोलीस उप-आयुक्त ,वाहतूक
पुणे शहर

**प्रति,**

१) **जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,** नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१
२/- सदरची प्रेसनोट सर्व वर्तमानपत्रातुन प्रसिध्द करण्याची विनंती आहे.

**प्रत :- २)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक – २,** पुणे शहर.

३) **पोलीस निरिक्षक, प्रेसरुम,** पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

४) **प्रभारी अधिकारी लोणीकंद** वाहतुक विभाग, पुणे शहर.
२/- **सदर प्रेसनोटच्या प्रती संबंधित दुकानदार / प्रतिष्ठीत व स्थानिक नागरिक यांना तात्काळ अदा करून, त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी तसेच अंतिम प्रेसनोट सादर करावी.**

५) **पोलीस उप निरीक्षक, मल्टीमिडीया कक्ष, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- सदर प्रेसनोट ही पुणे वाहतुक पोलीस वेबसाईट व फेसबुकवर / व्टिटरवर अपलोड करावी. सदरची प्रेसनोट कोणत्या वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्या वर्तमानपत्राचे कात्रणाची छायांकित प्रत इकडील कार्यालयात सादर करावी.

६) **पोलीस निरीक्षक, नियोजन, वाहतूक शाखा, पुणे शहर**
२/- संबंधित विभागांचे प्रभारी अधिकारी यांचेकडून पुर्तता अहवाल प्राप्त करुन घेऊन सादर करावा.